RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १२० (३)] बुधवार, ऑगस्ट ५, २०२६/श्रावण १४, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४२९**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑगस्ट, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एफएलआर-१२२५/प्र.क्र.२६५ (२)/राउशु-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास वाटते की, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (२) च्या खंड (जी) आणि (एच-१) व त्याबाबतीत प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम करीत आहे, जसे की खालीलप्रमाणे :—

१. या नियमांना महाराष्ट्र देशी मद्य (सुधारणा) नियम, २०२६ संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ च्या नियम २५ मधील खंड (d) च्या उप-खंड (v) नंतर खालील उप-खंड समाविष्ट करण्यात यावे, जसे की,—

"(vi) (अ) सीएल-३ अनुज्ञप्तीचे प्रस्तावित स्थलांतर निवासी तसेच निवासी-व-वाणिज्य संकुलामध्ये होत असल्यास व सदर संकुल महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६३ (१९६१ चा २४) मधील कलम ९ अंतर्गत नोंदणीकृत असल्यास सीएल-३ स्थलांतरणासाठी अशा सोसायटीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील,

(ब) एखाद्या निवासी तसेच निवासी-व-वाणिज्य संकुलास अंशतः भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त ठिकाणी स्थलांतरासाठी सोसायटीचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक राहील,

(क) अशा सोसायटीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन स्थलांतरीत झालेल्या सीएल-३ अनुज्ञप्तीसाठी दरवर्षी सदर सोसायटीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 5th August 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. FLR-1225/C.R.265 (2)/Exc-2.— Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, should be brought into force at once and therefore the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses, (*g*) and (*h-1*) of sub-section (*2*) read with proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, as follows, namely:—

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Amendment) Rules, 2026.

2. In rule 25 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973 in clause (*d*), after sub-clause (*v*), the following sub-clause shall be added, namely :—

"(*vi*) (*A*) If the proposed shifting of CL-3 licence is to be done in a residential or residential-and-commercial complex and if the said complex is registered as a society under section 9 of Maharashtra Co-operative Societies Act, 1963 (XXIV of 1961), it shall be mandatory to obtain the no-objection certificate from such society for shifting of CL-3 licence;

(*B*) No-objection certificate from the society shall also be mandatory for shifting of CL-3 licence to a residential or residential-and-commercial complex with partial occupancy certificate;

(*C*) For CL-3 license holder who has shifted to a registered society with a no-objection certificate from such society, there shall be no need to obtain a no-objection certificate from the said society every year."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.